महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड, ४ था मजला, प्लॉट जी-९, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.
Email : ciro@mahadiscom.in website : www.mahadiscom.in दूरध्वनी क्र. २६४७२१३१ / २६४७४२११
सी. आय. एन. नं. U४०१०९MH२००५SGC१५३६४५

जा.क्र. औसंवि/ब/रॅपिड ॲन्टीजन टेस्ट/शिबीर/१६३३२ दिनांक : ०५/१०/२०२०

# परिपत्रक

विषय : प्रकाशगड, धारावी तसेच एच.एस.बी.सी. येथे कार्यरत असलेल्या महावितरण व महानिर्मिती कंपनीतील कर्मचाऱ्यांकरीता प्रकाशगड, वांद्रे (पूर्व) येथे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने विनामुल्य कोविड -१९ ची रॅपिड ॲन्टीजन टेस्ट शिबीर आयोजित करणेबाबत.

*************

सद्यस्थितीत कोरोना विषाणूचा वाढता प्रादुर्भाव पाहता, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने महावितरण कंपनीच्या सांघिक कार्यालयामध्ये विनामुल्य कोविड -१९ ची रॅपिड ॲन्टीजन टेस्ट शिबीर आयोजित करण्याबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापनाच्या विचाराधिन होता.

त्यानुषंगाने, सक्षम प्राधिकारी यांनी दिलेल्या मंजूरीनुसार **प्रकाशगड, धारावी तसेच एच.एस.बी.सी. येथे कार्यरत असलेल्या महावितरण व महानिर्मिती कंपनीतील कर्मचाऱ्यांसाठी दि. ०७/१०/२०२० व ०८/१०/२०२० रोजी सकाळी १०:३० ते ०५:०० या कालावधीत सभागृह क्र. २, ६ वा मजला, प्रकाशगड, वांद्रे (पूर्व) येथे विनामुल्य कोविड -१९ ची रॅपिड ॲन्टीजन टेस्ट शिबीराचे आयोजन** करण्यात येत आहे.

**सदर शिबीराच्या माध्यमातून कर्मचाऱ्यांच्या कोविड -१९ रॅपिड ॲन्टीजन टेस्टचा अहवाल त्वरीत कळणार आहे. सदरचा अहवाल कोरोना संसर्गाबाबत (Positive) असल्यास महानगरपालिकेच्या वतीने RTPCR ही चाचणी देखिल विनामुल्य त्याच ठिकाणी करण्यात येणार आहे.**

सबब, प्रकाशगड, धारावी तसेच एच.एस.बी.सी. येथे कार्यरत असलेल्या महावितरण व महानिर्मिती कंपनीतील कर्मचाऱ्यांनी बहूसंख्येंने उपस्थित राहून शिबीराचा लाभ घ्यावा.

५/१०

**(ललित कि. गायकवाड)**
**सह मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी**

प्रत सविनय सादर :-
सर्व विभाग प्रमुख, महावितरण व महानिर्मिती कंपनी, सांघिक कार्यालय, मुंबई.
- आपणांस विनंती करण्यात येते की, सदरचे परिपत्रक आपल्या अधिनरत अधिकारी, अभियंते व कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावे.